# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आगरवाल विद्यालयात सायबर सिक्युरिटी वर केले मार्गदर्शन



**बारामती:** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राधेश्याम एन आगरवाल टेक्निकल इन्स्टिटय़ूट व ज्युनिअर कॉलेज बारामती येथे राबवण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर सायबर सुरक्षेची माहिती अत्यंत प्रभावी आणि संवादात्मक पद्धतीने सादर केली. सत्रात डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फेक लिंक्स आणि स्कॅमची ओळख, पासवर्ड संरक्षण तसेच वैयक्तिक माहितीची गोपनीयता जपण्याचे महत्त्व यावर विद्यार्थ्यांना समजेल अशा उदाहरणांसह माहिती देण्यात आली. संपूर्ण सत्र विद्यार्थ्यांच्या समजुतीला सोपी आणि रुचकर ठरेल अशा शुद्ध मराठी भाषेत घेण्यात आलं, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि चांगला प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचं विशेष वैशिष्ट्य म्हणजे प्रेझेंटेशनबरोबरच कथन, प्रश्नमंजुषा आणि संवादात्मक सत्राचा समावेश, ज्यामुळे विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत शिकण्याचा अनुभव घेतला. च्या मार्गदर्शनाखाली तयार केलेली माहिती अभ्यासपूर्ण आणि वास्तवाशी जोडलेली असल्याने ती विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी वाटली.

या विद्यालयाचे प्राचार्य

**पान २ वर...**